जिल्हा परिषद, लातूर.
आवक - टपाल क्र. ..........
विभाग
दिनांक 10 APR 2015
मुकाअ सप्रअ उप मुकाअ (सा.)
अति. मुकाअ मुकाअ

ग्राम विकास विभागांतर्गत कंत्राटदारांच्या
नोंदणी शुल्कात वाढ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
शासन निर्णय क्रमांकः ग्रासयो २०१५/प्र.क्र.११/योजना -९
बांधकाम भवन, ७ वा मजला, २५, मर्झबान पथ,फोर्ट, मुंबई-४००००१
दिनांक : १० मार्च, २०१५

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः ग्रासयो २००७/प्र.क्र.१/ योजना-९ दि.२०/०४/२००७ व दि.१८/०२/२००९

प्रस्तावना -

-उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयानुसार ग्राम विकास विभागासाठी कंत्राटदारांचे स्वतंत्र पंजीकरण सन २००७ पासुन करण्यात येत आहे. त्यासाठी आकारावयाचे शुल्क दि.२०.०४.२००७ च्या शासन निर्णयामध्ये विहित करण्यात आलेले आहे. सन २००७ ते माहे डिसेंबर २०१४ अखेर पर्यंत कंत्राटदार नोंदणी शुल्कात या विभागाकडून कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. मागील ७ वर्षात महागाई निर्देशांकांत मोठी वाढ झालेली आहे. शिवाय या विभागाकडून कंत्राटदार नोंदणीसाठी आकारण्यात येणारे शुल्क हे अन्य विभागामार्फत कंत्राटदार नोंदणीसाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. कंत्राटदारांच्या नोंदणीसाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काच्या स्त्रोतातुन मिळणारे उत्पन्न हे जिल्हा परिषदांच्या विविध विकास कामांसाठी वापरण्यात येत असते. या सर्व बाबींचा विचार करुन या विभागामार्फत कंत्राटदार नोंदणी करणासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यास अनुसरुन ग्राम विकास विभागातंर्गत कंत्राटदार नोंदणीकरणासाठी /नुतनीकरणासाठी/ श्रेणीवाढ करण्यासाठी आकारावयाच्या शुल्कात खालील प्रमाणे वाढ करण्याचा शासन निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय -

हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन स्थापत्य/ विद्युत कंत्राटदार नोदणी /नुतनीकरण/श्रेणीवाढसाठी खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे कंत्राटदार निहाय नोंदणी /नुतनीकरण/श्रेणीवाढ साठी शुल्क आकारण्यात यावे.

RoTA -H-1411-1(500-3-2015)

| १) स्थापत्य कामे :- | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | कंत्राटदार नोंदणी वर्ग | कंत्राटदाराची कामे करण्याची कमाल मर्यादा | कंत्राटदार नोंदणी / नुतनीकरण / श्रेणीवाढीसाठी आकारावयाचे शुल्क |
| १ | १ | २ | ३ |
| १ | १ अ | अमर्याद | ४०,०००/- |
| २ | १ ब | रु.२५०० लक्ष | ३५,०००/- |
| ३ | १ क | रु.१५०० लक्ष | ३५,०००/- |
| ४ | २ | रु.७५० लक्ष | ३०,०००/- |
| ५ | ३ | रु.३०० लक्ष | २५,०००/- |
| ६ | ४ | रु.१५० लक्ष | २०,०००/- |
| ७ | ४ अ | रु.९० लक्ष | १५,०००/- |
| ८ | ५ | रु.५० लक्ष | १०,०००/- |
| ९ | ५ अ | रु.३० लक्ष | ७,५००/- |
| १० | ६ | रु.१५ लक्ष | ५,०००/- |
| ११ | ७ | रु.१० लक्ष | ३,०००/- |
| १२ | ८ | रु.५ लक्ष | २,०००/- |
| १३ | ९ | रु.३ लक्ष | २,०००/- |

२) विद्युत कामे

| अ.क्र | कंत्राटदार नोंदणी वर्ग | कंत्राटदारांची कामे करण्याची कमाल मर्यादा | कंत्राटदार नोंदणी/ नुतनीकरण/ श्रेणीवाढीसाठी आकारावयाचे शुल्क |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | अ | अमर्याद | २५,०००/- |
| २ | ब | रु.२५ लक्ष | २०,०००/- |
| ३ | ब १ | रु.१५ लक्ष | १५,०००/- |
| ४ | क | रु.१० लक्ष | १०,०००/- |
| ५ | ड | रु.७.५ लक्ष | ५,०००/- |
| ६ | इ | रु.२ लक्ष | ३,०००/- |

H-1411-1A

३. ज्या कंत्राटदारांनी हा शासन निर्णय निर्गमित होण्यापुर्वी नोंदणी/नुतनीकरण/श्रेणीवाढीसाठीचे प्रस्ताव दाखल केले असतील परंतु त्यांचे प्रस्ताव मंजुरीच्या प्रक्रियेत आहेत, अशा कंत्राटदारांना देखील या शासन निर्णयातील वाढीव शुल्काप्रमाणे नोंदणी/नुतनीकरण/श्रेणीवाढीचे शुल्क भरणे अनिर्वाय राहील. अशा कंत्राटदारांना या शासन निर्णयानुसार आकारावयाच्या उर्वरीत शुल्काचा भरणा केल्यावरच त्यांना नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येईल.

४. कंत्राटदार नोंदणी/नुतनीकरण/श्रेणीवाढीसाठी प्रस्ताव दाखल करताना कंत्राटदारांना ५०% ना परतावा (Non Refundable) नोंदणी शुल्क भरणे अनिर्वाय राहील. उर्वरीत ५० % शुल्क कंत्राटदाराने नोंदणी मंजुर झाल्यावर नोंदणी प्रमाणपत्र घेण्यापुर्वी अदा करणे अनिर्वाय राहील. या माध्यमातून उपलब्ध होणा-या नोंदणी शुल्काची रक्कम "जि.प. सेस महसुली जमा ०५१५ पंचायत राज कार्यक्रम १०१ कंत्राटदार नोंदणी आकार" या लेखाशीर्षाखाली जमा करण्यात यावी.

५ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०३१२१७२२००२०२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHETE ARVIND TULSHIRAM

Digitally signed by SHETE ARVIND TULSHIRAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD,CID - 917063, postalCode=400032, st=Maharashtra, cn=SHETE ARVIND TULSHIRAM
Date: 2015.03.12 17:33:33 +05'30'

(अरविंद शेटे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अध्यक्ष, जिल्हा परिषद, (सर्व)
२. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा परिक्षा), मुंबई
३. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा परिक्षा) नागपूर
४. सर्व सह / उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
६. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
७. कार्यकारी अभियंता (बां), जिल्हा परिषद, (सर्व)
८. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
९. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई
१०. उप मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा, (वरिष्ठ) (सर्व)
११. निवड नस्ती कार्यासन योजना-९, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.